चटकदार कोडी



लेखक:
एन. टी. वर्तक

जयदीप प्रकाशन

चटकदार कोडी

एन. टी. वर्तक

जयदीप प्रकाशन

प्रकाशिका :
सौ. रेखा हर्डीकर
जयदीप प्रकाशन,
१०५, नारायण पेठ,
आनंदश्री को. ऑ. हौ. सो.
पुणे - ४११ ०३०.

मुद्रक :
ॲक्वा ग्राफिक्स,
१७६, नारायण पेठ,
पुणे - ४११ ०३०.

टाईपसेटिंग :
पॉझिटिव्ह एंटरप्राईझेस,
३९०- बी/१, नारायण पेठ,
पुणे - ४११ ०३०. फोन - ४२५२२६.

प्रकाशन दिनांक. २३ ऑगस्ट १९९१.

आतील चित्र : अलका जसवंडीकर

मुखपृष्ठ : शामकांत भालेकर

किंमत रु. १०/-

नाईकॉन प्रोसेस

चटकदार कोडी

आयुष्यभर फक्त

बुद्धी देवतेचीच उपासना करणाऱ्या

कै. नानासाहेबांना बुद्धीला चालना देणाऱ्या

कोड्यांचं पुस्तक काढायचं होतं.

पण ज्या दैवाला/नियतीला त्यांनी कधी जुमानलं नाही,

त्याला/तिला ते मंजूर नव्हतं.

.... आता हे पुस्तक

कै. नानांच्या स्मृतीला समर्पण !

चार शब्द

या पुस्तकात लहानपणापासून ऐकलेली व आठवणारी काही छान कोडी संग्रहित केली आहेत. या कोड्यांचे मूळ जनक कोण हे माहीत नाही. त्या सर्व अज्ञात बुद्धिवंतांना सादर प्रणाम !

माझे प्रिय मित्र श्री. बाबा पटवर्धन व श्री. बाबा ब्रह्मे यांनी ही कोडी जमविण्यात जे प्रोत्साहन दिले, त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. सौ. उषा वर्तक हिने अनमोल साहाय्य केले, त्याचा उल्लेख करणे अत्यावश्यक आहे.


'जयदीप' प्रकाशनच्या सौ. रेखा हर्डीकर यांनी मोठ्या आपुलकीने हा संग्रह पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याचे मनावर घेतले. त्याबद्दल त्यांना हार्दिक धन्यवाद !

ही कोडी वाचकांना आवडतील याची खात्री वाटते. अशीच छान छान कोडी वाचकांनी माझ्याकडे पाठविली, तर त्यांचा पुढील आवृत्तीत जरूर समावेश करता येईल.

६२७, सदाशिव पेठ,
पुणे - ३०

एन. टी. वर्तक

१: जादूची टोपली



माझ्याजवळ एक जादूची टोपली आहे. टोपलीत काही वस्तू ठेवल्या आणि मंत्र म्हटला की, दर मिनिटाला त्या वस्तू दुप्पट होतात. टोपली भरताच हा प्रकार थांबतो.

एकदा मी त्या टोपलीत काही संत्री ठेवली व जादूचा मंत्र म्हटला. बरोबर बारा मिनिटांनी ती टोपली संत्र्यांनी काठोकाठ भरली.

तर ती टोपली अर्धी भरण्यासाठी किती वेळ लागला असावा ?

२. उंदीर मारण्याचे यंत्र

दोन मांजरे दोन उंदरांना दोन मिनिटात मारतात.

तर ५० मांजरांना ५० उंदीर मारायला किती वेळ लागेल ?

३. लवकर गाडी पकडा




मला दोन मिनिटात दोन किलोमीटर दूर असलेल्या रेल्वे स्टेशनवर जाऊन गाडी पकडायची होती. मी पहिला किलोमीटर ताशी ३० कि.मी. वेगाने माझ्या कारमधून गेलो.

तर गाडी पकडण्यासाठी मला दुसरा किलोमीटर किती वेगाने जावे लागेल ?

---

४. घसरगुंडी



एक माकड एका १० मीटर खोलीच्या कोरड्या विहिरीत पडले. ते एका तासात २ मीटर वर चढते; पण एक मीटर खाली घसरते.

या पद्धतीने त्या माकडास विहिरीच्या वर येण्यास किती वेळ लागेल ?

---


५. चला फिरायला



दोन भारतीय व्यक्ती समुद्रकिनाऱ्यावरून फिरत होत्या. त्यांच्यातील लहान व्यक्ती मोठ्याचा मुलगा होता.


पण ती मोठी व्यक्ती त्याचा बाप नव्हती. तर त्यांचे नाते काय ?

६. फसाल बरं का !



एका सरळ रस्त्याच्या कडेला ५० मीटर अंतरावर विजेच्या दिव्याचे खांब बसविले आहेत.

तर पहिल्या व विसाव्या खांबापर्यंत किती मीटर अंतर असेल ?



७. फारच सोपे !

एका तराजूच्या पारड्यात २ किलो कापूस आणि दुसऱ्या पारड्यात ३ किलो शिसे ठेवले; तर कोणते पारडे वर राहील ?

८. नदी पार करा !



एका नदीच्या काठाजवळ एक माणूस व त्याचे दोन मुलगे आले. नदी ओलांडण्यासाठी नदीवर पूल नव्हता व नदीला खूप पाणी होते; पण तेथे एक होडी ठेवली होती. त्या होडीवर सूचना लिहिली होती की 'या होडीतून ८० किलोपेक्षा जास्त वजन नेणे धोक्याचे आहे.' वडिलांचे वजन ७० किलो आणि मुलांची वजने अनुक्रमे ४० व ३५ किलो होती.

तर नदी पार करण्यासाठी त्यांनी त्या होडीचा कसा उपयोग केला असेल ?

९. सोपे गणित


बावीस या संख्येतून दोन ही संख्या किती वेळा वजा करता येईल ?

१०. पाळीव प्राणी

शामरावांना पशू व पक्षी पाळण्याची फार हौस आहे. सध्या त्यांच्याकडे काही पशू व पक्षी आहेत. त्यांच्याकडे असलेल्या पशूपक्ष्यांच्या डोळयांची बेरीज ५६ आहे आणि त्यांच्या पायांची बेरीज ८० आहे.

तर शामरावांजवळ पशू किती आणि पक्षी किती ?

११. एक लिटर दूध द्या !




एक १० लिटरची बरणी दुधाने पूर्ण भरली आहे. त्यामधून एक लिटर दूध काढून घ्यावयाचे आहे.

माझ्याजवळ फक्त ५ लिटरची एक आणि २ लिटरची एक अशा दोन रिकाम्या बरण्या आहेत.

तर त्यांचा उपयोग करून मी एक लिटर दूध कसे घ्यावे ?

१२. मोठा कोण ?




पाच वर्षांपूर्वी श्याम वयाने जेवढा मोठा होता, तेवढाच आज राम वयाने मोठा आहे.

तर दोघात वयाने मोठा कोण ?

१३. चुकाल बरं का !

एक ताट व वाटी यांची किमत ४० रुपये आहे. ताटाची किंमत वाटीच्या किमतीपेक्षा तीस रुपयांनी अधिक आहे.


तर ताटाची किमत किती ?



१४. चटकन सांगा

पाय आहेत पण चालता येत नाही. हात आहेत पण काम करता येत नाही, असे कोण ?

१५. बस-प्रवास



'अ' आणि 'ब' या दोन गावात १२० किलोमीटर अंतर आहे. 'अ' येथून एक बस ताशी ४० किलोमीटर वेगाने निघाली आणि 'ब' येथून त्याच वेळी दुसरी बस ताशी ३० किलोमीटर वेगाने निघाली. ज्या वेळी या दोन्ही बसगाड्या एकत्र येतील, त्या वेळी कोणती बस 'अ' या गावापासून अधिक दूर असेल ?


१६. शेतातील खड्डा



एका शेतकऱ्याने आपल्या शेतात चार फूट लांब, तीन फूट रुंद आणि दोन फूट खोल खड्डा तयार केला.

तर त्यात किती माती असेल ?

१७. विमान अपघात



मुंबईचे एक धनाढ्य शेटजी दुसऱ्या दिवशी विमानाने दिल्लीला जाणार होते. संध्याकाळी ते प्रवासाची तयारी करत असता त्यांच्या बंगल्याचा रात्रपाळीचा पहारेकरी त्यांच्या जवळ आला आणि सलाम करून म्हणाला, "धनी, तुम्ही उद्या विमानाने दिल्लीला जाऊ नका. काल रात्री मला स्वप्नात त्या विमानाला अपघात झालेला दिसला."

शेटजींनी थोडा विचार केला आणि आपला प्रवासाचा बेत रद्द केला. आणि खरोखरच ते जाणार असलेल्या विमानाला प्रचंड अपघात झाल्याची बातमी दोन दिवसांनी त्यांनी वर्तमानपत्रात वाचली. त्यांनी त्या पहारेकऱ्याला बोलावले व त्याला मोठे बक्षीस दिले. पण त्यांनी त्या पहारेकऱ्याला कामावरून कमी केले.

याचे काय कारण असावे ?

१८. नाणेटंचाई

नाणेटंचाईच्या काळात एका रुपायाला १० पैसे वटाव देऊन मोड मिळत असे. एका दुकानदाराने आपल्या नोकराला १०० रुपयांच्या नोटा देऊन मोड आणण्यास पाठविले. नोकराने या व्यवहारात मालकाला योग्य ती मोड दिली; मोडवाल्याला योग्य तो वटाव दिला आणि एक रुपया खिशात टाकला. हे कसे ?

१९. जुनी नाणी

एका इतिहास संशोधकाने असे जाहीर केले की त्याला एक जुने तांब्याचे नाणे सापडले, त्यावर ख्रिस्तपूर्व ४५६ असा शिक्का आहे.

हे खरे की खोटे ? का ?

२०. मांजराची वाटणी

एका श्रीमंत कापड व्यापाऱ्याच्या इस्टेटीची त्याच्या चार मुलांत वाटणी झाली. प्रत्येक मुलाला भरपूर रोकड पैसे व एकएक कापडाचे दुकान मिळाले. राहत्या मोठ्या घराचे चार भाग करून त्यामध्ये ते स्वतंत्रपणे राहू लागले. त्या सर्वांचे एक आवडते मांजर होते, त्याची वाटणी कशी करायची ? म्हणून त्यांनी त्याचे चार पाय

आपापसात वाटून घेतले आणि ते चौघेही त्याचे कोडकौतुक करू लागले.

एकदा त्या मांजराच्या एका पायाला जखम झाली. तो पाय सर्वात धाकट्या भावाच्या वाटणीचा होता. त्याने त्याच्या पायावर मलमपट्टी करून बँडेज बांधले. मांजर सुखावले आणि चुलीजवळ शेकत बसले. एवढ्यात त्याच्या पायावरील बँडेजने पेट घेतला व मांजर घाबरून पळत सुटले. मांजर पळतपळत इतर तीन भावांच्या कापड दुकानात गेले. पेटलेल्या बँडेजमुळे आग लागून तिन्ही दुकानांचे नुकसान झाले.

हा प्रकार लहान भावाच्या वाटणीच्या मांजराच्या पायामुळे झाला म्हणून तिघा भावांनी त्याच्याकडून नुकसानभरपाई मागितली.

धाकट्या भावाच्या वकिलाने कोर्टात युक्तिवाद केला व तो निर्दोष सुटला. उलट इतर तीन भावांवरच ठपका ठेवण्यात आला. कसा ?

२१. सांगा बरं ?

रामाला कृष्णाच्या मागे आणि कृष्णाला रामाच्या मागे एकाच वेळी कसे उभे राहता येईल ?

२२. लाल हिरवे चेंडू



एका खेळण्यांच्या दुकानदाराने तीन खोकी रबरी चेंडू मागविले. एका खोक्यात लाल रंगाचे चेंडू होते; दुसऱ्या खोक्यात हिरव्या रंगाचे चेंडू होते आणि तिसऱ्या खोक्यात लाल व हिरवे चेंडू निम्मेनिम्मे होते.

त्या दुकानदाराकडे ती तीन खोकी आली. खोक्यावर "लाल चेंडू", "हिरवे चेंडू" आणि "लाल-हिरवे चेंडू" अशी लेबल्स लावलेली होती. पण त्याबरोबर पत्राने हे कळविले होते की तिन्ही खोक्यावरची लेबल्स चुकीची लावली गेली आहेत.

तर त्या दुकानदाराला फक्त एक खोके उघडून एक चेंडू बाहेर काढून तिन्ही खोक्यात कोणत्या रंगांचे चेंडू आहेत हे सांगता येईल का?

२३. आइस्क्रीम खाऊ या !



उन्हाळ्याच्या सुट्टीत तीन मित्र चैतन्य, वेद आणि अगस्ती एका हॉटेलात गेले. प्रत्येकाने तीन तीन प्लेटस् आइस्क्रीम खाल्ले. वेद याला दुसरीकडे जाण्याची घाई होती म्हणून तो लौकर निघून गेला. पण जाताना तो हॉटेलच्या बिलापोटी पंधरा रुपये देऊन गेला. चैतन्याने सहा प्लेटसचे व अगस्तीने तीन प्लेटसचे पैसे दिले.

तर वेद याने दिलेले पंधरा रुपये चैतन्य व अगस्ती यांनी कसे वाटून घ्यावे ?

२४. भावंडे किती ?

एका कुटुंबातील सर्व मुलं मैदानात खेळत होती. त्यापैकी प्रत्येक मुलाला जेवढे भाऊ होते, तेवढ्याच बहिणी होत्या. पण प्रत्येक मुलीला बहिणींच्या तिप्पट भाऊ होते.

तर ती किती भावंडे होती ?

२५. चेंडू भरून ठेवा !

यशोधनजवळ नऊ रबरी चेंडू होते आणि चार प्लॅस्टिकच्या रिकाम्या पिशव्या होत्या. जर त्याला प्रत्येक पिशवीत विषम संख्येने ते चेंडू ठेवावयाचे असल्यास त्याने ते चेंडू त्या पिशव्यात कसे ठेवावे ?


२६. त्याचे आयुष्य किती ?



एका माणसाच्या कबरीवर पुढील मजकूर खोदला होता. "या माणसाने आपल्या आयुष्याचा सहावा भाग बालपणात आणि आठवा भाग तारुण्यात घालविला. नंतर बारावा भाग संपवून त्याने लग्न केले. त्यानंतर पाच वर्षांनी त्याला मुलगा झाला. तो मुलगा नेहमी आजारी असे. बापाच्या एकूण आयुष्याच्या अर्धे आयुष्यच तो जगला. मुलाच्या मृत्युमुळे त्या माणसाला फार दुःख झाले आणि तो मुलाच्या मृत्युनंतर फक्त चार वर्षे जगला आणि निधन पावला.

तर त्या माणसाचे एकूण आयुष्य किती ?

२७. दोषी कोण ?



एका घरावर रात्री दरोडा पडला. पोलिसांनी तपास करून तीन संशयितांना अटक केली. आपण त्यांना 'अ', 'ब' आणि 'क' म्हणू या. त्या तिघांनी पुढीलप्रमाणे जबाब दिले :

'अ' म्हणाला, "त्या रात्री, त्या घरापासून मी साठसत्तर मैल दूर होतो."


'ब' म्हणतो, " 'अ' खोटे सांगतो."

'क' सांगतो, "मी निर्दोष आहे."

पोलिसांना पक्के माहीत आहे की तिघांपैकी दोघे खोटं बोलतात व फक्त एकच खरं सांगतो.

तर दोषी कोण ?

२८. ब्रेडचे वजन



एका मोठ्या पावाचे (ब्रेडचे) २०० ग्रॅम आणि अर्धा पाव वजन आहे.

तर त्या पावाचे वजन किती ?

---

२९. नदी कशी पार करावी ?

एक शिकारी होडीने नदी पार करण्यासाठी नदीकाठावर आला. त्याच्या जवळ एक शेळी, एक वाघ व एक गवताचा भारा आहे. तो होडीतून एका वेळी एकालाच नेऊ शकतो. गवताचा भारा नेला तर वाघ शेळीला खाईल; वाघाला नेले तर शेळी गवत खाईल. तर त्याने त्यांना नदीपार कसे करावे ?

---

३०. जड बॉक्स कशी ओळखाल ?

सुप्रियाने भाऊबिजेच्या दिवशी २५० ग्रॅमच्या ९ बॉक्सेस खरेदी केल्या. त्या तिच्या पिशवीत ठेवताना विक्रेत्याच्या लक्षात आले की त्यामध्ये एक बॉक्स चुकून ३०० ग्रॅमची झाली आहे. त्याने तराजूचा कमीत कमी वेळा उपयोग करून ती बॉक्स बाजूला केली. तर त्याने ते ओळखण्यासाठी कमीत कमी किती वजने केली ?

---

३१. हजार मोहरा



प्राचीन काळी एक विद्वान राजा राज्य करत होता. राजा विद्वान पंडितांबरोबर दरबारात वादविवाद करी व त्यांचा सत्कार करी. एकदा एक पंडित त्या राजाच्या दरबारात आला. त्याच्या विद्वत्तेवर राजा खुष झाला व त्या पंडिताचा द्रव्य देऊन मानसन्मान करण्याचे राजाने ठरविले; पण राजाने एक मजेदार अट घातली.

राजा म्हणाला, “समोर टेबलावर तीन चांदीचे पेले ठेवण्यात आले आहेत. पहिल्या पेल्यात एक हजार सोन्याच्या मोहरा, दुसऱ्या पेल्यात शंभर सोन्याच्या मोहरा व तिसऱ्या पेल्यात फक्त एकच सोन्याची मोहर आहे. यापैकी एक पेला आपणास जिंकायचा आहे; पण त्यासाठी माझी एक अट आहे. आपण कोणतेही एक विधान

करावे. ते विधान जर चुकीचे आहे असे ठरले तर आपणास एक मोहर असलेला पेला मिळेल. जर आपण केलेले विधान बरोबर असेल तर आपणास शंभर व हजार मोहरा असलेल्या पेल्यांपैकी एक पेला मिळेल. आपण विचार करून एक वाक्य सांगा व हजार मोहरा मिळवा. आपण हरलात तर आपणास फक्त एक मोहोर असलेला पेला मिळेल."

पंडिताने थोडा वेळ विचार केला व त्याने विधान केले, "मला आज शंभर मोहरा मिळणार नाहीत."

हे वाक्य ऐकून राजा बुचकळ्यात पडला व राजाला त्या पंडिताला एक हजार मोहरा असलेला पेला द्यावा लागला.


हे असे का घडले ? तुम्ही सांगू शकाल का ?

३२. लहान कुकर

एका बाईने एक जुना प्रेशर कुकर १०० रुपयांना विकत घेतला. तिला तो लहान वाटल्याने तिने तो कुकर मैत्रिणीला ११० रुपयाला विकला. पण पुढे तिला तो विकल्याबद्दल खेद वाटला व मैत्रिणीकडून तिने तो १२० रुपये देऊन परत घेतला. काही दिवसांनी तिला त्या कुकरचा कंटाळा आला व तिने तो १३० रुपयाला विकून टाकला.

तर तिला या व्यवहारात किती रुपये नफा अगर तोटा झाला.


३३. कसं कराल ?



आकृतीत आठ काचेच्या बरण्या एका ओळीत मांडून ठेवल्या आहेत. पहिल्या चार बरण्या चॉकलेटसनी भरल्या आहेत; पण पुढच्या चार बरण्या रिकाम्या आहेत.

कमीत कमीं किती बरण्या हलविल्या म्हणजे एक भरलेली बरणीनंतर एक रिकामी बरणी या क्रमाने त्या मांडता येतील ?

३४. आकृती काढा पाहू !




खालील आकृती तुम्ही कागदावरून पेन न उचलता व एका रेषेवरून दोनदा न जाता काढू शकाल का ? कशी ?

३५. केकचे सारखे तुकडे




सुप्रियाला तिच्या आईने वाढदिवसाला मोठा केक आणला होता. तर सुरीने कमीत कमी किती वेळा कापून त्या केकचे आठ सारखे तुकडे करता येतील ?

३६. ओळखा पाहू !



आकृतीमध्ये तीन रेषा आहेत आणि प्रत्येक रेषेवर तीन वर्तुळे आहेत. मधले वर्तुळ तिन्ही रेषांवर आहे. तुम्ही या सात वर्तुळात १ पासून ७ पर्यंत आकडे असे लिहा की प्रत्येक रेषेवरील वर्तुळातील आकड्यांची बेरीज सारखी होईल. बेरीज कितीही झाली तरी चालेल; पण तिन्ही बेरजा सारख्याच पाहिजेत.

३७. समोरासमोरची घरे



एका हौसिंग सोसायटीने एका सरळ पण उतरत्या रस्त्याच्या दोहो बाजूस अगदी सारखी घरे बांधली. डाव्या बाजूच्या चढत्या रस्त्यावरील घरांना एकपासून क्रमाने क्रमांक दिले आणि त्यापुढचे क्रमांक उजव्या बाजूच्या उतरत्या रस्त्यावरील घरांना वरपासून खालच्या शेवटच्या घरापर्यंत दिले.

जर अगदी समोरासमोरच्या घरांचे क्रमांक ४१ आणि ६० असे असले तर तेथील एकूण घरांची संख्या किती ?

३८. सांगा पाहू !

एका मुलाने उदबत्तीच्या कारखान्यातून काही उदबत्तीचे पुडे खरेदी केले. त्यापैकी अर्धे पुडे त्याने पुड्यामागे पन्नास पैसे नफा घेऊन विकले आणि उरलेले पुडे, पुड्यामागे एक रुपाया जास्त घेऊन विकले. या व्यापारात त्याला ३६ रुपये नफा झाला.

तर त्याने किती उदबत्तीचे पुडे खरेदी केले होते ?

३९. एक रुपाया कोठे गेला ?



दोन बाया रस्त्याच्या कडेला पेरू विकत होत्या. एकीजवळचे पेरू जरा लहान होते. ती एक रुपयाला ३ पेरू विकत होती. दुसरी एक रुपयाला २ पेरू विकत होती. त्यांनी खूप वेळ पेरू विकले व प्रत्येकीजवळ तीस पेरू उरले. ते पेरू त्यांनी एकत्र केले व दोन रुपयांना ५ पेरू या दराने पेरू विकायला सुरवात केली. सर्व पेरू विकून झाल्यावर त्यांनी त्या ६० पेरूंच्या विक्रीचा हिशोब केला; तर त्यांना त्या पेरूंचे २५ रुपये मिळण्याऐवजी २४ रुपयेच मिळाले होते.

हा एक रुपाया कमी कसा मिळाला ? तुम्ही सांगू शकाल का ?

४०. शेतकरी आणि कुत्रा



एक शेतकरी आपल्या कुत्र्यासह आपल्या घराकडे निघाला आहे. शेतकऱ्याच्या चालण्याचा वेग सरासरी ताशी पाच किलोमीटर आहे. तो घरापासून १० किलोमीटर अंतरावर आल्यावर कुत्र्याची साखळी काढून घेतो आणि कुत्रा ताशी १० किलोमीटर वेगाने पळत सुटतो. कुत्रा घरापर्यंत जातो आणि परत शेतकऱ्याजवळ येतो. असे तो शेतकरी घरी पोचेपर्यंत करत राहातो.

तर कुत्रा, त्याची साखळी काढल्यापासून एकूण किती अंतर धावला ?

४१. तेल वाटून द्या !

दोन शेजारणींनी ८ लिटरचा गोडेतेलाचा डबा विकत घेतला. त्यांना ते तेल सारखे वाटून घ्यायचे आहे. त्यांच्याजवळ ५ लिटर आणि ३ लिटरच्या दोन बरण्या आहेत.

तर त्या दोन बरण्यांच्या मदतीने त्यांनी कसे वाटप करावे ?

---

४२. नफा का तोटा ?




एका सायकल दुकानदाराने दोन सायकली ६०० रुपयांना विकल्या. एका सायकलीवर त्याला २० टक्के फायदा झाला तर दुसऱ्या सायकलीवर त्याला २० टक्के तोटा झाला.

तर या व्यवहारात त्याला एकूण नफा अगर तोटा किती झाला ?

---

४३. ओळखा पाहू !



एका बटव्यात ७० रुपयांची नाणी आहेत. त्यामध्ये एक रुपयाची, पन्नास पैशांची आणि पंचवीस पैशांची नाणी आहेत.

तिन्ही प्रकारच्या नाण्यांची संख्या सारखी असल्यास, प्रत्येक प्रकारच्या नाण्यांची किंमत किती ?

४४. सांगा पाहू !

एका दुकानदाराने एका परदेशी प्रवाशाला ५५० रुपयाला एक रेडियो विकला. त्यामध्ये त्याला ५० रुपये नफा झाला. प्रवाशाने दुकानदाराला प्रत्येकी १०० रुपयांचे ६ प्रवासी चेक्स दिले. दुकानदाराने त्याला ५० रुपये परत केले. दुसऱ्या दिवशी त्याने ते चेक्स मोठ्या व्यापाऱ्याला दिले आणि ६०० रुपये घेतले व ते त्या व्यापाऱ्याने बँकेकडे पाठविले. पण ते चेक्स खोटे असल्यामुळे बँकेने स्वीकारले नाहीत. व्यापाऱ्याने ते दुकानदाराला परत करून ६०० रुपये परत घेतले.

तर या व्यवहारात त्या दुकानदाराचे एकूण किती नुकसान झाले ?

४५. चला स्टेशनकडे

मी स्टेशनकडे फिरावयास जात असता मला वाटेत एक शेतकरी, त्याची बायको, चार मुले आणि त्यांचा कुत्रा समोरून येताना दिसले. तर एकूण किती जण स्टेशनकडे चालले होते ?

४६. चहाची भेसळ

एका चहाच्या व्यापाऱ्याने ५० रुपये प्रति किलो दराने एक प्रकारचा चहा खरेदी केला आणि त्यामध्ये ६० रुपये प्रति किलो दराचा चहा मिसळला व ते मिश्रण ७० रुपये प्रति किलो या भावाने विकले. त्यामुळे त्या व्यापाऱ्याला खरेदीवर २५ टक्के नफा झाला.


तर त्याने १०० किलो मिश्रण बनवण्याकरता प्रत्येक प्रकारचा चहा किती किलो वापरला होता ?

४७. फायद्यात कोण ?

एका कारखानदाराने दोन कामगार कामावर ठेवले. त्यांना सहा महिन्यांचा १००० रु. पगार ठरला. पगारवाढीबद्दल असे ठरले की, त्यांना पगारवाढ दर वर्षी ३०० रु. मिळेल. जर त्यांना दर सहामाहीस पगारवाढ पाहिजे असेल; तर दर सहा महिन्यांनी १०० रु. पगार वाढेल. त्या दोघांनी विचार करून एकाने वार्षिक ३०० रु. पगारवाढ स्वीकारली तर दुसऱ्याने सहामाही पगारवाढ पसंत केली.

तर त्या दोघांमध्ये फायद्यात कोण ?

४८. बॅट केवढ्याची ?




यशोधनजवळ बॉल होता पण बॅट नव्हती. त्याला घेऊन त्याची आई खेळण्याच्या दुकानात गेली. दुकानदाराने बॅट आणि बॉलची किंमत ५-२५ रुपये सांगितली. बॅटची किंमत बॉलपेक्षा ७५ पैशांनी जास्त होती. तर बॅटची किंमत किती ?

४९. कुठे काय घडले ?

आम्ही मोटर-सायकलीवरून अजिंठ्याची सहल काढली होती. आम्ही औरंगाबादहून दुपारी बारा वाजता निघालो. थंडीचे दिवस होते. थंडगार वारा सुखवित होता. आम्ही १ तास आणि ३० मिनिटात अजिंठ्यास पोचलो. तीन तास लेणी पाहून आम्ही परत निघालो. आकाशात थोडे ढग होते. परतीच्या प्रवासाला आम्हाला ९० मिनिटे लागली. असे का घडले ?

५०. भिंगातून दिसणारा कोन ?




मी एका कागदावरील दोन रेषांमधील ५ अंशांचा कोन सहापट मोठे दिसणाऱ्या सूक्ष्मदर्शक भिंगातून पाहिला, तर तो कोन मला किती मोठा दिसेल ?

५१. शाबास मधुरा !

मधुराने एक परीक्षा दिली. पेपरात १०० वस्तुनिष्ठ प्रश्न होते व प्रत्येक प्रश्नाला एक गुण होता. मधुराने बहुतेक सर्व प्रश्न बरोबर सोडविले; पण तिचे काही प्रश्न चुकले. तिला ८८ गुण मिळाले. परीक्षेची अशी अट होती की प्रत्येक चुकीच्या उत्तराबद्दल बरोबर दिलेल्या दोन उत्तरांचे गुण कमी करायचे.

तर मधुराने किती प्रश्न बरोबर सोडविले ?

५२. निम्म्या आकाराच्या विटेचे वजन



बांधकामाच्या एका मातीच्या विटेचे वजन ४ किलोग्रॅम आहे. त्याच मातीच्या अर्ध्या आकाराच्या म्हणजेच लांबी, रुंदी व जाडी निम्मे असलेल्या विटेचे वजन किती भरेल ?

५३. वह्यांची खरेदी

तीन मित्र वह्या आणण्यासाठी दुकानात गेले. दुकानात ३०० पानी, २०० पानी आणि १०० पानी दहा-दहा वह्या शिल्लक होत्या. त्यांची किंमत अनुक्रमे प्रत्येकी ३ रुपये, २ रुपये व १ रुपाया होती. त्यांनी त्या सर्व वह्या खरेदी केल्या. प्रत्येकाने तिन्ही प्रकारच्या मिळून एकूण दहा वह्या घेतल्या आणि प्रत्येकाला दुकानदाराला सारखेच पैसे द्यावे लागले.

तर प्रत्येकाने प्रत्येक प्रकारच्या किती वह्या घेतल्या ?

५४. लाल पगडी

प्राचीन काळी एक राजा विद्वानांचा आदरसत्कार करण्यासाठी प्रसिद्ध होता. त्याच्या दरबारी अनेक देशांतून बुद्धिमान पंडित येत असत. राजा त्यांच्या बुद्धिचातुर्याचे कौतुक करून त्यांना मोठे नजराणे देत असे. एकदा त्या राजाकडे असेच तीन पंडित आले. राजा त्यांच्या बुद्धिचातुर्यावर खुष झाला व त्याने त्यांचा सत्कार करण्याचे ठरविले. पण राजाच्या महामंत्र्याने सुचविले की, त्या तिघांत अधिक विद्वान कोण आहे हे पाहून त्याचा विशेष मोठा सत्कार करावा. राजाला हे पटले व त्याने महामंत्र्यालाच त्यांची परीक्षा घ्यावयास सांगितले.

महामंत्र्याने दरबारातील मधल्या गालिच्याच्या तीन बाजूंना तीन खुर्च्या ठेवल्या व त्या तीन खुर्च्यांवर त्या तीन पंडितांना बसविले. मग महामंत्री पंडितांना म्हणाला, "आमचे महाराज आपल्या तिघांच्या बुद्धिचातुर्यावर बेहद्द खुष आहेत व ते आपला सत्कार करू इच्छितात; पण तत्पूर्वी आपली एक छोटी परीक्षा मी घेणार आहे व आपणांपैकी जो ही परीक्षा उत्तीर्ण होईल त्याचा विशेष सत्कार करण्यात येईल. आपण तिघांनी या तीन खुर्च्यांवर बसावे. मी आपणांपैकी प्रत्येकाला एक मौल्यवान पगडी देणार आहे. ती पगडी आपल्या डोक्यावर ठेवताना आपण कृपया डोळे बंद करून घ्यावे. आमच्याकडे दोन रंगांच्या पगड्या आहेत - लाल

आणि जांभळया. पगड्या घातल्यावर आपण डोळे उघडू शकता. त्यामुळे तुम्हाला तुमच्या दोन मित्रांच्या पगड्या दिसू शकतील; पण स्वतःची पगडी दिसणार नाही."

त्यानंतर महामंत्र्याने तिन्ही पंडितांच्या डोक्यावर तिन्ही लाल रंगाच्या पगड्या ठेवल्या व त्यांना डोळे उघडण्यास सांगितले.

महामंत्री म्हणाला, "तुम्हाला दुसऱ्या दोघांच्या पगड्या दिसत आहेत. तुम्हाला एक जरी लाल पगडी दिसली तरी तुम्ही खुर्चीतून उठून उभे राहायचे व नंतर जेव्हा तुमच्या स्वतःच्या डोक्यावर कोणत्या रंगाची पगडी आहे हे तुमच्या लक्षात येईल तेव्हाच परत खुर्चीत बसायचे."

तिन्ही पंडित उभे राहिले. बराच वेळ उभेच होते. मग त्यापैकी एक पंडित खाली बसला.

महामंत्र्याने त्याला विचारले, "तुमच्या डोक्यावर कोणत्या रंगाची पगडी आहे हे तुम्हाला समजले का ?"

"हो" तो म्हणाला, "लाल पगडी", हे त्या पंडिताला कसे समजले हे त्याने स्पष्ट करून सांगितले.

तुम्ही सांगू शकाल का ?

५५. जांभळांची वाटणी

एक विधवा बाई आपल्या तीन शाळकरी मुलींसह एका गावात राहात होती. एके दिवशी दुपारी त्या बाईने चांगली टपोरी काळी जांभळे विकत घेतली व स्वच्छ धुवून एका पातेल्यात झाकून ठेवली. सोबत तिने मुलींसाठी एक चिठ्ठी लिहून ठेवली,

"शाळेतून आल्यावर पातेल्यातील जांभळे तिघी जणीत वाटून घ्या !" आई.

ती बाई कामाला बाहेर निघून गेली. प्रथम धाकटी मुलगी शाळेतून आली. तिने जांभळे व आईची चिठी पाहिली. तिने जांभळांचे तीन भाग केले व आपल्या वाट्याची जांभळे घेतली. तेने उरलेली जांभळे झाकून ठेवली, ती चिठी पातेल्याजवळ ठेवली व ती मैत्रिणीच्या घरी खेळायला गेली. नंतर मधली मुलगी शाळेतून आली तिने चिठी वाचून आपल्या वाट्याची जांभळे घेतली व उरलेली जांभळे व चिठी ठेवून ती गाण्याच्या क्लासला गेली. नंतर थोरली मुलगी आली. तिनेही आपणच सर्वात प्रथम घरी आलो या समजुतीने चिठी वाचून आपल्या वाट्याची जांभळे घेतली व उरलेली जांभळे व चिठी ठेवून ती पोहण्याच्या वर्गाला गेली.

संध्याकाळी ती बाई व तिन्ही मुली घरी आल्यावर ती बाई मुलींना म्हणाली, "तुम्ही जांभळे बरोबर वाटून घेतलेली दिसत नाहीत. त्या पातेल्यात अजून आठ जांभळे शिल्लक आहेत."

मग सर्व उलगडा झाला. त्या बाईने मधल्या मुलीला तीन व थोरलीला पाच अशी जांभळे दिली व सर्वांना सारखी जांभळे मिळाली. तर त्या पातेल्यात किती जांभळे ठेवली होती ?

५६. रात्रीचा अभ्यास

यशोधन रात्री अभ्यासाला बसला होता. एवढ्यात वीज गेली. त्याने दोन मेणबत्या लावल्या. त्या दोन्ही मेणबत्या सारख्याच लांबीच्या होत्या; पण एक जाड व दुसरी बारीक होती. जाड मेणबत्ती सहा तास जळणारी तर बारीक मेणबत्ती चार तास जळणारी होती. काही वेळाने त्याने मेणबत्या विझवल्या व तो झोपी गेला. विझलेल्या जाड मेणबत्तीची लांबी उरलेल्या बारीक मेणबत्तीच्या बरोबर दुप्पट होती.


तर यशोधनने मेणबत्यांच्या प्रकाशात किती वेळ अभ्यास केला ?

५७. वजनदार मित्र

चार मित्रांच्या वजनांची सरासरी ५४ किलो आहे. पहिल्या तीन मित्रांच्या वजनात दोनदोन किलोचा फरक आहे. तिसऱ्या व चौथ्या मित्राच्या वजनात सहा किलोचा फरक आहे.

तर त्यांची प्रत्येकी वजने किती ?

५८. बरोबर जोड्या जिळवा !



वरील आकृतीमधील अंक १ आणि १, २ आणि २ तसेच ३ आणि ३, रेषांनी एकमेकांना जोडा. मात्र जोडणाऱ्या रेषांनी परस्परांना छेदता उपयोगी नाही.

---

५९. झाडे लावा

शाळेत बाग तयार करण्यासाठी आम्ही १०० मातीच्या कुंड्या विकत घेतल्या. विद्यार्थ्यांनी त्या स्वतःच शाळेत आणण्याचे ठरविले. विद्यार्थ्यांनी कुंड्या काळजीपूर्वक आणाव्या म्हणून उत्तेजनार्थ त्यांना सांगण्यात आले की सुरक्षितपणे आणलेल्या प्रत्येक कुंडीमागे २५ पैसे बक्षीस देण्यात येईल व प्रत्येक फुटलेल्या कुंडीमागे ५० पैसे बक्षिसातून कमी करण्यात येतील. विद्यार्थ्यांना २२ रुपये मिळाले तर किती कुंड्या फुटल्या ?

---

६०. बँकेतील कर्मचारी

पुण्यातील एका बँकेच्या एका शाखेत एकूण ५६ कर्मचारी आहेत. त्यापैकी २४ महिला आहेत. त्या कर्मचाऱ्यांबद्दल खालील माहिती उपलब्ध आहे.

(अ) एकूण ४२ कर्मचारी विवाहित आहेत.

(ब) ४४ कर्मचारी वयाने २५ चे वर आहेत.

(क) ३८ विवाहित वयाने २५ चे वर असून त्यामध्ये २४ पुरुष आहेत.

(ड) २८ पुरुष वयाने २५ चे वर आहेत.

(इ) एकूण २६ पुरुष विवाहित आहेत.

तर त्या शाखेत एकूण अविवाहित महिला किती व त्यापैकी वयाने २५ चे वर किती ?

उत्तरे

(१) अकरा मिनिटे (२) दोन मिनिटे (३) जाण्यात अर्थ नाही. गाडी चुकलीय. (४) नऊ तास (५) आई व मुलगा (६) ९५० मीटर (७) कोणतेही पारडे वर जाणार नाही (८) प्रथम दोघे मुलगे होडीतून गेले व एक मुलगा परत आला. मग बाप पलीकडे गेला. दुसरा मुलगा होडी घेऊन परत आला व दोघे भाऊ पलीकडे गेले. (९) फक्त एकदाच (१०) बारा पशू व सोळा पक्षी.

(११) दोन लिटरची बरणी तीन वेळा भरून पाच लिटरची बरणी भरावी. एक लिटर दूध उरेल. (१२) श्याम. (१३) पस्तीस रुपये (१४) खुर्ची (१५) दोन्ही बसेस सारख्याच अंतरावर राहातील. (१६) काही नाही. (१७) पाहाऱ्याचे वेळी झोप काढून तो स्वप्न पाहात असे. (१८) नोकराने फक्त नव्वद रुपयांची मोड घेतली. नऊ रुपये वटाव देऊन एक रुपया खिशात टाकला. (१९) खोटे (२०) ते मांजर इतर तीन भावांच्या वाटणीच्या चांगल्या पायांनी पळाले हा युक्तिवाद मान्य होऊन धाकटा भाऊ निर्दोष सुटला.

(२१) त्यांनी पाठीला पाठ लावून उभे राहावे. (२२) दुकानदाराने 'लाल-हिरवे चेंडू' असे लेबल असलेले खोके उघडावे त्यात दोन्ही रंगाचे चेंडू निश्चित नसतील. त्यात एका रंगाचे चेंडू असतील. समजा लाल निघाले तर 'हिरवे चेंडू' लिहिलेल्या खोक्यात दोन्ही रंगाचे चेंडू असतील व 'लाल चेंडू' लिहिलेल्या खोक्यात हिरवे चेंडू असतील. (२३) अगस्तीने तीन प्लेटस

घेतल्या व त्याचे पैसे दिले. चैतन्याने सहा प्लेटसचे पैसे दिले पण त्याने स्वतः तीनच घेतल्या होत्या. म्हणून वेद याने दिलेले पैसे त्याला मिळावेत. (२४) पाच भावंडे तीन मुलगे व दोन मुली. (२५) तीन पिशव्यात प्रत्येकी तीन चेंडू ठेवून त्या तिन्ही पिशव्या चौथ्या पिशवीत ठेवाव्या. (२६) बहात्तर वर्षे. (२७) पहिली दोन विधाने परस्परविरोधी आहेत म्हणजे त्यापैकी एक खरे आहे व एक खोटे आहे. म्हणजेच उरलेले 'क'चे विधान खोटे असले पाहिजे. 'क' दोषी ठरतो. (२८) चारशे ग्रॅम. (२९) प्रथम त्याने शेळीला नदीपार करावे. नंतर गवताचा भारा न्यावा व शेळीला परत आणावे मग वाघाला न्यावे आणि परत येऊन शेळीला न्यावे. (३०) फक्त दोन वजने लागतील. बॉक्सेसचे तीनतीनचे तीन गट करावे. त्यापैकी एक जड असेल. दोन गट तराजूच्या दोन पारड्यात टाकावे. त्यावरून कोणता गट जड आहे ते कळेल. जड गटातील दोन बॉक्सेस मग तराजूच्या दोन पारड्यात टाकाव्या. यावरून जड बॉक्स समजेल.

(३१) पंडिताचे विधान चुकीचे मानले तर त्याला एक मोहर देणे शक्य होते. त्याला एक मोहर दिल्यास त्याचे विधान बरोबर होते व त्याला शंभर किंवा हजार मोहरा द्याव्या लागतात. त्याला शंभर मोहरा दिल्यास त्याचे विधान चुकीचे ठरते म्हणून राजाला त्याला हजारच मोहरा द्याव्या लागल्या. (३२) त्या बाईला या व्यवहारात फक्त वीस रुपये नफा झाला. (३३) फक्त दुसरी व चौथी बरणी पाचव्या आणि सातव्या बरणीत रिकाम्या करून त्यांच्या जागेवर ठेवा. (३४) 'ड' बिंदूपासून आरंभ करा आणि 'अ'

बिंदूत पूर्ण करा. (३५) केकला काटकोनात दोन उभे कट घ्यायचे. तिसरा कट केकच्या तळाला समांतर केकच्या मध्यातून आडवा घ्यायचा. (३६) मधल्या वर्तुळात १, ४ किंवा ७ आकडा पाहिजे. (३७) शंभर घरे. समोरासमोरच्या घरांच्या क्रमांकाची बेरीज नेहमी १०१ होणार. (३८) अठ्ठेचाळीस उदबत्तीचे पुडे. (३९) उरलेले ६० पेरू एक रुपयाला अडीच या भावाने विकले गेले. त्यामुळे एका बाईला २ रुपये जास्त आले तर दुसऱ्या बाईला ३ रुपये कमी मिळाले. (४०) कुत्र्याची साखळी सोडल्यापासून शेतकऱ्याला घरी पोचायला २ तास लागतील. तेवढ्या वेळात कुत्रा २० किलोमीटर धावेल.

(४१) ५ लिटरची बरणी भरून ३ लिटरच्या बरणीत ओतावी. म्हणजे २ लिटर तेल उरेल. ३ लिटरची बरणी मोठ्या बरणीत ओतून तिच्यात ते २ लिटर तेल घ्यावे. मग ५ लिटरची बरणी पुन्हा भरून ती हळू हळू ३ लिटरच्या बरणीत ओतावी म्हणजे १ लिटरने ३ लिटरची बरणी भरेल व ५ लिटरच्या बरणीत ४ लिटर तेल उरेल. ३ लिटरची बरणी मोठ्या बरणीत रिकामी केली की ते दुसरे ४ लिटर तेल मिळेल. (४२) ५० रु. तोटा. (४३) प्रत्येक प्रकारची नाणी चाळीस. (४४) ५५० रुपये. (४५) मी एकटाच स्टेशनकडे चाललो होतो. (४६) चाळीस किलो आणि साठ किलो. (४७) सहामाही वाढ मिळणारा कामगार फायद्यात राहील. (४८) बॅटची किंमत तीन रुपयें. (४९) जाण्यायेण्याला सारखाच वेळ लागला. (५०) कोन तेवढाच राहील.

(५१) मधुराने ९६ प्रश्न बरोबर सोडविले. (५२) पाचशे ग्रॅम.

(५३) दोन मित्रांनी तीन (३०० पानी), चार (२०० पानी), आणि तीन (१००) पानी वह्या घेतल्या; तर तिसऱ्याने चार (३०० पानी), दोन (२०० पानी) व चार (१०० पानी) वह्या घेतल्या. (५४) तो पंडित म्हणाला, "मला माझ्या दोन मित्रांच्या डोळयावर दोन लाल पगड्या दिसतात. जर माझ्या डोक्यावर जांभळी पगडी असती तर माझ्या मित्रांना कळले असते की 'त्या दोघांना एक एक लाल पगडी दिसत आहे म्हणूनच ते उभे आहेत. म्हणजेच त्यांच्या प्रत्येकाच्या डोक्यावर लाग पगडी आहे. पण त्यांना हे ठरविता येत नाही; कारण माझ्या डोक्यावर लालच पगडी आहे; म्हणून ते खाली बसू शकत नाहीत." (५५) एकूण २७ जांभळे होती. (५६) तीन तास. (५७) ५० किलो, ५२ किलो, ५४ किलो आणि ६० किलो. (५८) सोबतची (खालील) आकृती पाहा. (५९) चार कुंड्या. (६०) अविवाहित महिला आठ. त्यापैकी दोन पंचवीसचे वर.

(५८) चे उत्तर :

* * *